भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

प्रेसनोट

भिवंडी शहरातील अधिकाधिक मतदारांनी आगामी लोकसभा 2024 च्या निवडणूकीत निर्भयपणे मतदान करावे :- अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

आगामी सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या पार्श्वभूमीवर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने विशेष मतदार जनजागृती अभियान सूरू केले असून शहरातील अधिकाधिक मतदारांनी आगामी लोकसभा निवडणूकीत निर्भयपणे मतदान करून लोकशाहीचे बळकटीकरण करावे, असे आवाहन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांनी केले आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या मतदार जनजागृती अभियान 2024 अंतर्गत दि. 09 मार्च 2024 रोजी बी. एन. एन. महाविद्यालय, भिवंडी येथे नेहरू युवा केंन्द्र, आधार सामाजिक संस्था व भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. त्यात 120 पेक्षा अधिक विद्यार्थी विद्यार्थीनी सहभाग घेतला.

तसेच दि. 10 मार्च 2024 रोजी भिवंडी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सहेली जायंटस् ग्रुप ऑफ भिवंडी, जी. एम. मोमीन महिला महाविद्यालय व भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सुमारे 300 महिला व विद्यार्थीनी सहभागी झाल्या. यावेळी मतदार जनजागृतीपर पोवाड्याचे सादरीकरण करण्यात आले.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील माध्यमिक विद्यालये तसेच महाविद्यालये यामध्ये निबंध स्पर्धा, आई-बाबांना पत्र लेखन, तसेच निवडणूक साक्षरता मंच याद्वारे विद्यार्थ्यांना मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रेरक म्हणून काम करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

मागील लोकसभा निवडणूक 2019 मध्ये शहरातील ज्या भागांत मतदानाची टक्केवारी कमी झाली आहे, अशा परिसरांना महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी गृहभेटी आणि मोहल्ला कमिटी बैठकीद्वारे जनजागृती करण्यात येत असून आगामी काळात महिला मतदार, दिव्यांग मतदार, ज्येष्ठ नागरिक मतदार, तृतीयपंथी मतदार, देहविक्रय करणाऱ्या महिला मतदार, भटके विमुक्त मतदार, यंत्रमाग कामगार मतदार इत्यादी वंचित घटकांचा निवडणूकीत सहभाग वाढविण्यासाठी विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती 23 भिवंडी लोकसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी तथा महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके यांनी दिली आहे.

(जनसंपर्क अधिकारी)

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका